# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ५७ वी बैठक दिनांक २२ ऑक्टोबर २००८

### ठराव

मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ५७ वी बैठक दि. २२.१०.२००८ रोजी मा. मंत्रीमहोदयांचे दालन, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**(अ) नियामक मंडळाचे सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | उपाध्यक्ष व वि.स.स. |
| ३. | मा. इं. ए. बा. पाटील (अ.का.) | ... | सचिव (जसं) व सदस्य |
| ५. | मा. इं. ए. बा. पाटील | ... | सचिव (लाक्षेवि) व सदस्य |
| ६. | इं. ह. य. कोळवले | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**(ब) नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. श्री. पु. कोतवाल, कक्ष अधिकारी | ... | अप्पर मुख्य सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| २. | श्रीमती माधुरी कोकणे, सहसचिव | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**(क) निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. शि. मा. उपासे | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| २. | श्री. शिलानाथ जाधव | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम) |

सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**“मान्य”**

**सही/-**
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

**सही/-**
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ५७ वी बैठक दिनांक २२ ऑक्टोबर २००८

ठराव क्र. ५७/१

"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ५६ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र. ५७/२

"ठराव करण्यात येतो की, श्री.ज्ञा.द.शिंदे, कायदा सल्लागार यांना महामंडळाच्या पत्र क्र.७७६४, दि.३०/८/२००७ च्या अटीचे अधिन राहून दि.१/९/२००७ पासून दरमहा रु.१७०००/- ठोक रकमी सल्ला फी अदा करण्यास नियामक मंडळाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे."

नियामक मंडळाच्या पुढील बैठकीत आवश्यक माहितीसह ठराव कायम करण्यात यावा.

ठराव क्र. ५७/३

"ठराव करण्यांत येतो की, जनहित याचिका क्रमांक १४८/२००६ मध्ये महामंडळाची बाजू मांडण्यासाठी श्री. विजय द. पाटील, ॲडव्होकेट उच्च न्यायालय यांना प्रत्येक न्यायालयीन कामकाजाच्या दिवसासाठी रू. २३३४/- फी अदा करण्यांस नियामक मंडळाची मान्यता येत आहे."

ठराव क्र. ५७/४

"ठराव करण्यांत येतो की,प्रकल्पग्रस्तांसाठी अपवादात्मक प्रकरण (**exceptional case**) म्हणून बुध्दिहाळ मध्यम प्रकल्पातील गाळपेर जमीनी प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या मौजे गौडेवाडी सहकारी सामुदायिक संस्था मर्यादित गौडेवाडी यांना २१०.२० एकर व सोमेवाडी सहकारी सामुदायिक संस्था सोमेवाडी यांना ३६३.१० एकर अशी एकूण ५७३.३० एकर जमीन (२३२ हे.) जमीन कसण्यासाठी रू. १०० प्रति वर्ष / प्रति हेक्टर १२ महिने मुदतीच्या कराराने भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ५७/५

"ठराव करण्यांत येतो की, माणिकडोह डाव्या कालव्याच्या गळतीमुळे श्री. दत्तात्रय अर्जुन नायकोडी, मु. पो. तेजेवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे यांचे गट क्र. २०/२+३ मधील १.७३ हेक्टर क्षेत्रामधील जमीनीचे सन २००५-२००६ ते २००७-२००८ या कालावधीमध्ये झालेल्या नुकसान भरपाईपोटी खास बाब म्हणून रू.५१,८१५/-(रू. एकावन्न हजार आठशे पंधरा फक्त) इतकी आर्थिक मदत श्री. दत्तात्रय अर्जुन नायकोडी यांना अदा करण्यास खालील दोन अटींच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

१. श्री. नायकोडी यांना पुनःश्च नुकसान भरपाई मागणी करता येणार नाही.
२. या प्रकरणाचा पुर्वोधारण म्हणून यापुढे अशा प्रकारच्या कोणत्याही प्रकरणात उपयोग करता येणार नाही."

**"मान्य"**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ५७ वी बैठक दिनांक २२ ऑक्टोबर २००८

सिंचनात् राष्ट्रोध्दार:

ठराव क्र. ५७/६

"ठराव करण्यांत येतो की, मौजे ब-हाणपूर ग्रामपंचायत यांनी भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या विहिरीसाठी मागणी केलेली निरा डावा कालवा कि. मी. ७०/८०० मधील २०० चौ. मी. (२१५२ चौ. फू.) जागा महामंडळाकडे जमीनीची चालू बाजारभावाप्रमाणे किंमत व नियमित पाणीपट्टी भरण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत संबंधीत ग्रामपंचायतीस कायमस्वरूपी वर्ग करणेस नियामक मंडळाची मान्यता देणेत येत आहे."

ठराव क्र. ५७/७

"ठराव करण्यात येतो कि महामंडळाच्या अंतर्गत सर्व कार्यालयांमध्ये दैनंदिन व्यवहारात सर्व बँकांकडून नेट बँकिंग अंतर्गत view only ही सुविधा उपलब्ध करुन घेण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देणेत येत आहे."

ठराव क्र.५७/८

"ठराव करण्यात येतो की सन २००७-०८ या वर्षाचे प्रकल्प विकास लेखापत्रक व ३१/३/२००८ अखेरचा ताळेबंद याद्वारे स्वीकृत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने घेतलेले आयत्या वेळचे विषय

ठराव क्र. ५७/९

"ठराव करण्यात येतो की, पिंपळगांव जोगे डाव्या कालव्याच्या कि.मी.४७ च्या मंजूर संरेखेवर असणाऱ्या खालील ७ शेतकऱ्यांच्या घराची / बांधकामाची नुकसान भरपाई एकूण रुपये ४,१७,२५६/- (रुपये चार लक्ष सतरा हजार दोनशे छप्पन्न फक्त) संबंधितांना अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

| अ. क्र | कालवा सा.क्र. | घरमालकाचे नाव | गट क्र | बांधकाम प्रकार | घराची अंदाजपत्रकीय किंमत | घसारा | देय रक्कम | बांधकामाचे वर्ष | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | ४६/६१० | श्री महादू दगडू गुंजाळ गुळूंचवाडी(पिंपळझाप) ता.जुन्नर जि पुणे | १२०/२ | गवती छप्पर व तुळशी वृंदावन | १०००० | ४३६४ | ५६३६ | १९९८ | २४.०० |
| २ | ४६/७०५ | श्री पांडरंग रामभाऊ गुंजाळ श्री किसन रामभाऊ गुंजाळ श्रीम.सुलाबाई रामभाऊ गुंजाळ श्रीम सुशाबाई रंगनाथ गुंजाळ | ११९ | संडास, मंदीर, पाण्याची टाकी, तुळशी वृंदावन, दोन गोठे | ४०००० | ८९१ | ३९१०९ | २००४ | ३४.४८ |

**"मान्य"**

सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ५७ वी बैठक दिनांक २२ ऑक्टोबर २००८

| अ. क्र | कालवा सा.क्र. | घरमालकाचे नाव | गट क्र | बांधकाम प्रकार | घराची अंदाजपत्रकीय किंमत | घसारा | देय रक्कम | बांधकामाचे वर्ष | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ३ | ४६/१०७० | श्री बबन गोविंद गुंजाळ गुळूंचवाडी(पिंपळझाप) ता.जुन्नर जि पुणे | १०४ | वीट बांधकाम सिमेंटमध्ये | १३७१२१ | ५९८ | १३६५२३ | १९९८ | ७१.७४ |
| ४ | ४६/११३० | श्रीम इंदूबाई धोंडीबा गुंजाळ गुळूंचवाडी(पिंपळझाप) ता.जुन्नर जि पुणे | १०४/१ | मातीमधील दगड/वीट बांधकाम | ८१८७९ | १६७९५ | ६४९८४ | १९८८ | ३४.५० |
| ५ | ४६/११६० | श्री सुरेश लक्ष्मण गुंजाळ | १०४ | मातीमधील दगड/वीट बांधकाम | ७२४४६ | २२३४ | ७०२१२ | १९९३ | ३०.२६ |
| ६ | ४६/११८० | श्री बबन भिका गुंजाळ | १०४ | मातीमधील दगड/वीट बांधकाम | ५२००० | १६०४ | ५०३९६ | १९९३ | २६.८० |
| ७ | ४६/११९५ | श्री गोविंद हरी गुंजाळ | १०४ | मातीमधील दगड/वीट बांधकाम | ५२००० | १६०४ | ५०३९६ | १९९३ | २६.०० |
| | | **एकूण रुपये** | | | | | ४१७२५६ | | |

ठराव क्र. ५७/१०

“महामंडळाचा सन २००८-०९ मधील आर्थिक आढावा” हा विषय नियामक मंडळाच्या माहितीसाठी सादर केलेला असल्याने याबाबत कोणताही ठराव केलेला नाही.”

ठराव क्र. ५७/११

“महामंडळाच्या गुंतवणुकीचा तपशील हा” विषय नियामक मंडळाच्या माहितीसाठी सादर केलेला असल्याने याबाबत कोणताही ठराव केलेला नाही.”

ठराव क्र. ५७/१२

“ ठराव करण्यात येतो की, कंत्राटदारांच्या बिलांच्या देय रकमा कार्यकारी अभियंता यांनी स्वाधीकारे कंत्राटदारांच्या खात्यात परस्पर इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर पद्धतीने (EFTS) वर्ग करण्याची योजना राबविणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**“मान्य”**

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |